ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १९ | पुणें, बुधवार तारीख २२ जुलै, १९५३ | अंक १९

## विविध माहिती

**हवा सुखकारक राखणाऱ्या इमारती**—दिल्लीमध्यें व्हिक्टोरिआ रस्त्यावर आणि इंद्रप्रस्थ एस्टेटमध्यें बांधल्या जाणाऱ्या सरकारी इमारतींत हवा सुखकर राखण्याचें साहित्य बसविण्यांत येणार आहे. पहिल्या इमारतीसाठीं प्रत्येकीं ४,१२,००० रुपये आणि दुसऱ्या इमारतीसाठीं १,४६,००० रुपये खर्च येणार आहे. ह्या इमारती बांधण्यासाठीं एकूण अनुक्रमें ३९,४९,००० रुपये आणि ४१,४२,००० रुपये खर्च येईल.

**बर्लिनमध्यें 'शकुंतला'**—बर्लिनमधील एका सिनेमागृहांत राजकमल चित्र 'शकुंतला' हें २८ जूनपासून दाखविण्यांत येत असून चित्रपटाला चांगली गर्दी होते, असें समजतें. हा चित्रपट सर्व प. जर्मनींत दाखविण्यांत येणार आहे. चालू महिन्यांत 'अमर भूपाळी' हा मराठी चित्रपटहि जर्मनींत दाखविण्यांत येणार आहे.

**हरद्वार-बद्रीनाथ रस्ता**—हरद्वार तें बद्रीनाथ हा रस्ता लवकरच राजरस्ता म्हणून जाहीर होणार असून उत्तर प्रदेश सरकारच्या सार्वजनिक बांधकाम-खात्याकडे सोपविण्यांत येणार आहे. ह्या दोन ठिकाणांमधील अंतर २०० मैलांचें असून त्यांतील १५० मैल मोटारीनें तोडतां येतें. उरलेलें ५० मैल अंतर जाण्यासाठीं मोटारींची सडक लवकरच तयार करण्यांत येणार आहे.

**जमीन लागवडीची योजना**—उत्तर प्रदेशाची नेपाळला लागून असलेली सरहद्दीनजीकची अरण्यमय असलेली बरीच मोठी जमीन लागवडीखालीं आणण्यांत येणार आहे. ह्या योजनेला मध्यवर्ती सरकारची संमति आहे. राज्य-सरकार १·५ कोटी रुपये योजनेपायीं खर्च करणार आहे. योजना पूर्ण झाल्यावर धान्योत्पादनाला अधिक जमीन उपलब्ध होईलच; पण शिवाय लुटारूंचें एक आश्रयस्थानहि नष्ट होईल.

**कॅरिबिअन बेटांत 'बैजू बावरा'**—शास्त्रीय संगीताबद्दल प्रसिद्ध पावलेला 'बैजू बावरा' हा चित्रपट कॅरिबिअन बेटांतून दाखविण्यासाठीं चित्रपटाचें इंग्रजीकरण करण्यांत येत आहे. चित्रपटाची लांबी १४,००० फूट आहे ती १०,००० फूट करण्यांत येईल. वेस्ट इंडीज बेटांत भारतीय बोलपट दाखविला जाण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे.

**जपान अणु-संशोधन करणार**—जपान पुढील वर्षी अणुसंशोधनाची एक प्रयोगशाळा स्थापन करणार आहे. सर्व प्रयोगशाळा उभी रहाण्यास तीन वर्षें लागतील आणि तीसाठीं ७२·९ कोटी येन म्हणजे सुमारें १,१०,००,००० रुपये खर्च येईल. प. युरोपीय देशांनींहि आपली स्वतंत्र अणुसंशोधन शाळा स्थापण्याचा निर्णय नुकताच घेतला आहे.

**भोपाळ सरकारचें आमंत्रण**—भोपाळमधील अरण्यांत अगर ऐतिहासिक स्थळांजवळ कोणा चित्रपट-निर्मात्याला देखावे घ्यावयाचे असतील तर भोपाळ सरकार त्याचें स्वागत करील, असें राज्य-सरकारचे अर्थमंत्री श्री. कांता प्रसाद ह्यांनीं नुकतेच मुंबई येथें बोलून दाखविलें.

**आहार आणि गुन्हेगारी**—तेल अवीव म्युनिसिपालिटीचे एक सभासद रबी ॲब्रामॉव्हिट्झ ह्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं, इस्राइल राज्यांत गुन्हेगारीला सध्या जो ऊत आला आहे त्याला कारण डुकराचें मांस खाणें आणि अशुद्ध मांसाहार हें आहे. गुन्ह्यांत खून आणि बलात्कार ह्यांचें प्रमाण बरेंच आहे.

**मालकीच्या टेलिफोन्सची व्यवस्था**—स्वतःच्या मालकीचे टेलिफोन्स देण्याची जी व्यवस्था भारतीय पोस्ट व टेलिफोन खात्यानें केली आहे, तिचा फायदा १४,००० लोकांनीं घेतला आहे. खात्यातर्फे इतके टेलिफोन्स बसविण्यांत आले असून सरकारला त्यांचें ३४० लाख रुपये मिळाले, असें समजतें.

**१०० वर्षांत रेल्वेवर झालेला खर्च**—गेल्या १०० वर्षांत भारतीय रेल्वेवर झालेला भांडवली खर्च ३३ लाख रुपयांपासून ८६२ कोटी रुपयांपर्यंत वाढला आहे. उत्पन्नांतहि अशीच मोठी वाढ झाली आहे. १८५३ मध्यें भारतीय रेल्वेचें एकूण उत्पन्न १९,००० रुपये होतें. १९५१–५२ सालीं तें २९४ कोटी रुपये झालें

**प्लायवुडचें भारतांतील उत्पादन**—१९५१ सालीं भारतांत ७,०८,५४,६३६ चौरस फूट प्लायवुडचें उत्पादन झालें होतें. १९५२ मध्यें ८,७०,९४,९१६ चौरस फूट प्लायवुड निर्माण करण्यांत आलें.

**ब्रिटिश विद्यापीठांतील विद्यार्थी**—युद्ध संपल्यापासून ब्रिटनच्या विद्यापीठांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या फुगत चालली आहे. १९३८–३९ सालीं विद्यार्थ्यांची संख्या ५०,२४६ होती. गेल्या वर्षी ही संख्या ८३,४५८ पर्यंत वाढली. विद्यापीठांच्या एकूण उत्पन्नापैकीं ६४·५ टक्के उत्पन्न सरकारी मदतीचें असतें. १९३८ सालीं हें प्रमाण ३१·४ टक्के होतें. तेव्हांपासून प्राध्यापकांच्या संख्येंत ४५ टक्के वाढ झाली असून अध्यापकांच्या संख्येंत १९० टक्के वाढ झाली आहे.

**टोळधाडीविरुद्ध चीनला मदत**—चीनच्या वायव्य प्रांतांतील पिकांचें टोळधाडीपासून रक्षण करण्यासाठीं रशिआनें विमानें आणि तज्ज्ञ ह्यांची मदत दिली होती. ह्या मदतनिसांनीं गेल्या २२ ते २५ जूनपर्यंत १०,००० एकर जमिनीवरील टोळांचा अगर त्यांच्या अंड्यांचा फडशा पाडला, असें समजतें.

## विणकामासारखा जोडधंदा सुरू करण्याची दिशा

ग्रामीण विकासयोजनांच्या यशाच्या दृष्टीनें खेडेगांवांतून बैठे उद्योगधंदे सुरू करणें आवश्यक आहे. हिंदमध्यें ७० टक्के लोक उपजीविकेसाठी केवळ शेतीवर अवलंबून असले तरी यांपैकी पुष्कळशा लोकांना वर्षांतून पांच सहा महिने विशेष कांहीं काम नसतें. कांहीं वेळां हे लोक मुंबई सारख्या ठिकाणीं हंगामी नोकरीला जाणें, भाजीपाला करणें, गांवांतच मजुरी करणें इ. व्यवसाय करतांना आढळतात परंतु यांत निश्चितपणा कांहींच नसतो. अशा ठिकाणीं विशेषतः हातमागावर कापड विणणें यासारखा धंदा ग्रामीण–विकास योजनांमार्फत सुरू केला, तर तें परिणामीं फायदेशीर ठरेल असें वाटतें. कुलाबा जिल्हा भातशेतीविषयीं प्रसिद्ध आहे. परंतु तेथें भाताचें पीक वर्षांतून एकदांच काढतात व पुष्कळ गांवांतून बैठे किंवा जोड उद्योगधंदे जवळजवळ नाहींतच. अलिबाग तालुक्यांत आवास व किहीम या दोन मोठ्या गांवांच्या दरम्यान 'थळयाचा पाडा' म्हणून ठिकाण आहे व तेथें दहा अकरा घरें आहेत. हे लोक खंडानें भातशेती करतात व कोळी असल्यामुळें कांहीं वेळां गलबतावर नोकरीला जातात. परंतु अगदीं अलिकडे मे १९५१ मध्यें चौकशी केली असतां असें आढळून आलें कीं, या लहानशा ठिकाणीं निदान पांच महिने सात किंवा आठ लोक रिकामे असतात. कोणत्याहि निश्चित व्यवसायाच्या अभावीं हे लोक पांच महिने रिकामेच राहातात. या लोकांचे श्रम सकारणीं लावावयाचे तर तेथें निदान दोन हातमाग चालवितां येतील. सवडीनुसार लोकांना मागावर काम करतां येईल. प्रत्येकानें रोज ४ तास मागावर काम केलें तरी त्याला निदान आठ आणे मजुरी रोज सुटूं शकेल. म्हणजे पांच महिने मागावर रोज ४ तास काम करून ७५ रु. एका माणसाला मिळवितां येतील. याप्रमाणें या लहानशा ठिकाणांतील ८ माणसांना वर्षाला ६०० रु. मिळवितां येतील.

ही योजना व्यवहारांत कशी आणावी हा प्रश्न आहे. खेडेगांवांतील परिस्थितीची निश्चित कल्पना रेव्हिन्यू खात्यांतील लोकांना, विशेषतः तलाठी व सर्कल इन्स्पेक्टर्स यांना असते. कोणत्या गांवांत हातमागासारखा व्यवसाय जोडधंदा म्हणून सुरू करतां येईल हें रेव्हिन्यू खात्याला ठरवितां येण्यासारखें आहे किंवा सध्यां सुरू असलेल्या ग्रामीण विकासयोजनांच्या अधिकाऱ्यांनाहि आपापल्या केंद्रांतून हातमागाचा जोडधंदा कोठें सुरू करतां येईल हें अजमावितां येण्यासारखें आहे. या दृष्टीनें हा प्रश्न विचारांत घेतला पाहिजे. अशाप्रकारें एखाद्या गांवांत विणकामाचा जोडधंदा सुरू करावयाचा तर विणकाम जाणणाऱ्या एखाद्या विणकराला त्या गांवांत एक किंवा दोन हातमाग ताब्यांत देऊन सरकारनें नेमावें. विणकरवर्गांतील आजची बेकारी लक्षांत घेतां सरकारला या कामासाठी लायक कोष्टी मिळूं शकतील. येथें केलेली सूचना अगदीं क्षुल्लक वाटली तरी अशा तऱ्हेचें धोरण हिंदमधील ५॥ लक्ष खेडेगांवांतील जास्तींत जास्त खेडेगांवांतून सुरू केलें गेलें तर त्याचा आर्थिक दृष्ट्या चांगला परिणाम निश्चित होईल.

---

### सूर्याचे फोटो घेणार

पृथ्वी व सूर्य ह्यांचेमध्यें ९,३०,००,००० मैल अंतर आहे. त्यांपैकी १५ मैल अंतर तोडून वर जाऊन सूर्याचे फोटो घेण्याची तयारी ब्रिटिश शास्त्रज्ञांनीं चालविली आहे. १५ मैल वर एक बलून पाठविण्यांत येईल, त्यांत ठेवलेला कॅमेरा फोटो घेईल. ब्रिस्टल विद्यापीठांतील शास्त्रज्ञांनीं बलूनची योजना केली आहे.


**१९५० अखेरचें ११ वें यशस्वी मूल्यमापन**

**१९५० मध्येंही रु. २६५ लाखांवर नवीन विम्याचें पूर्ण काम.**

**वे स्ट र्न इं डि या**

**विमा कंपनीनें**

**आपलें सामर्थ्य, स्थैर्य व सेवा**

यासंबंधीची प्रचिती पुन्हां एकवार विमा जगतास आणून दिली आहे.

**दर हजारी त्रैवार्षिक बोनस**

| हयातींतील पॉलिसी | हयातीनंतरची पॉलिसी |
|---|---|
| रु. २७ | रु. ३३ |

कंपनीच्या वाढत्या वैभवांत सहभागी व्हा व सर्वोत्कृष्ट फायद्यासाठी

**वेस्टर्न इंडियाची निवड करा.**

के. वाय. जोशी, बी. ए., एफ. आय. ए.

मॅनेजर

**वेस्टर्न इंडिया लाईफ**

**इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा.**

शाखा कचेरीः—

| शहर | कँप |
|---|---|
| १७९ बुधवार पेठ, लक्ष्मीरोड, पुणें. | केअर–ऑफ क्रेसवेल्स ईस्ट स्ट्रीट, पुणें–१ |

फोन नंबर— ३४०२



**दि बेळगांव बँक लिमिटेड**

**स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक**

**दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक**

शाखाः—संकेश्वर, होसूर (पो. शहापूर), गोकाक, कँप (बेळगांव), वेंगुर्ले, मालवण, नंदगड, गडहिंग्लज, रामदुर्ग, चिकोडी, नरगुंद, शिरोडा, चिपळूण, कणकवली, निपाणी, बैलहोंगल, मिरज, अथणी, देवगड, सावंतवाडी, टिळकवाडी (बेळगांव), सौंदत्ती.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. | १,९०,००० |
| ठेवी | रु. | ७९,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ९२,९३,००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतीमध्यें अद्ययावत् पद्धतीचा सेफडिपॉझिट व्हॉल्ट १० एप्रिल, १९५२ पासून सुरू झाला.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

जी. एल. गजेंद्रगडकर, चेअरमन.

ए. आर. नाईक, मॅनेजिंग डायरेक्टर.

एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. ११ जुलै, १९५३





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## गेल्या दोन वर्षांतील किंमतीमधील चढउतार

### सध्याच्या वाढत्या महागाईचें कारण काय ?

गेल्या दोन वर्षांत, भारतांतील जिनसांच्या किंमतींचे बावतींत खालील तीन गोष्टी दिसून आल्या:—( १ ) पहिल्या बारा महिन्यांत किंमतींत २१% उतार झाला. ( २ ) पुढील नऊ महिन्यांत किंमतींची पातळी साधारणपणें स्थिर राहिली; मात्र वेगवेगळ्या जिनसांतील चढ-उताराचें प्रमाण वेगवेगळें होतें. ( ३ ) १९५२–५३ च्या शेवटच्या तिमाहीपासून किंमती चढत गेल्या आहेत. रिझर्व्ह बँकेच्या संबंधित खात्यांनीं ह्याबावत रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया बुलेटिनमध्यें एकत्रित माहिती प्रसिद्ध केली आहे.

कोरियन युद्धामुळें किंमती एकदम भडकल्या, त्या खाली येण्याची प्रवृत्ति सबंध जगांतच सगळीकडे होती. ती प्रवृत्ति भारतांतहि आढळली. बाहेरच्या ह्या व्यापक कारणाबरोबर, दोन अंतर्गत कारणांचा भारतांत अंमल होता, त्यांपैकीं पहिलें कारण १९५१ अखेर अंगीकारलेलें नाणेंविषयक धोरण व दुसरें कारण पंचवार्षिक योजनेची अंमलबजावणी. ह्या कारणांमुळें किंमती, उत्पादन, आयात व साठा ह्या सर्वांसच नवें वळण लागलें.

कोरियन युद्धापूर्वीच्या मानानें एप्रिल १९५१ मधील किंमती भारतांत १६% नें वाढल्या. अमेरिकेंत किंमतवाढ त्याच प्रमाणांत, तर ग्रेट ब्रिटनमध्यें ती ३०% नीं जास्त झाली. इतर कित्येक देशांतील वाढीचें प्रमाण ह्यापेक्षाहि जास्त होतें. भारतांतील किंमतवाढींत औद्योगिक कच्च्या मालाची किंमत सर्वांत जास्त (४०%) वाढली. बँक रेट वाढविल्यावर हिंदी किंमतींची पातळी २·६% उतरली, आणि १९५२ च्या प्रारंभीं कोरिअन सरासरी किंमतीपेक्षा ती पातळी फक्त १०% नें वरती होती. तुलनेनें पहाता, अमेरिकन किंमती १४% नें व ब्रिटिश किंमती ३०% नें चढीच्या होत्या.

कोरिअन युद्धचलतीमुळें, जागतिक तुलनेनें हिंदी घाऊक किंमतींत वाढ जरा बेतानेंच झाली, तरी वैयक्तिक जिनसांच्या किंमती एकाच गतीनें वाढल्या नाहींत. आंतरराष्ट्रीय बाजारांत कच्चें रबर व कच्ची लोकर ह्यांच्या किंमती अनुक्रमें २१५% व १६३% वाढल्या. त्यामानानें भारताच्या तागाच्या किंमतींमधील १५७% वाढ बरीच कमी होती. कच्च्या तागाखेरीज बाकी हिंदी मालाच्या किंमती फार कडाडल्या नाहींत. त्यांत कच्च्या कातड्यांच्या किंमतीच्या वाढीचा उच्चांक (८६%) होता. भारतांत किंमती उतरण्यास प्रारंभ मात्र उशीरा झाला. ताग व इतर निर्गत होणाऱ्या मालास परदेशांत असलेली प्रचंड मागणी, हें त्याचें कारण होतें.

१९५१–५२ मध्यें, पूर्वीच्या वर्षाच्या मानानें शेतीचें उत्पादन किंचित सुधारलें. औद्योगिक उत्पादन मात्र १२% वाढलें. १९५१ च्या अखेरीस त्यांत विशेष वाढ झाली. ह्या उत्पादनवाढीस कापड, लोखंड आणि पोलाद ह्यांनीं विशेष हातभार लावला. अंतर्गत उत्पादनांतील वाढ व परराष्ट्रीय व्यापारांत आयातीचें वर्चस्व, ह्यांमुळें जिनसांचा पुरवठा समाधानकारक राहिला.

पुरवठ्याच्या बाजूनें वरील गोष्टी किंमतीस खाली ओढूं लागल्या, तर मागणीच्या बाजूनें १९५१–५२ च्या मोसमाचे आरंभीं अंमलांत आणलेलें नाणेंविषयक धोरण खेचूं लागलें. सोडतीच्या स्वरूपाच्या साठेबाजीस हें धोरण मारक ठरलें. बिल मार्केट योजनेमुळें खऱ्या व्यापारी व्यवहारांची कुचंबणा झाली नाहीं आणि कर्जाऊ पैशाचा तुटवडा असा भासला नाहीं. फेब्रुवारी, १९५२ चे अखेरीस किंमती खाली येऊं लागल्या आणि मार्च १९५२ मध्यें किंमतींचा इंडेक्स ३७४·९ वर आला. एप्रिल, १९५१ मध्यें तो ४६२·० होता; म्हणजे उतार २१% झाला.

घाऊक मालाच्या किंमतींचा इंडेक्स एप्रिल, १९५२—मार्च, १९५३ ह्या मुदतींत साधारणतः स्थिर राहिला; एकूण चढउतार ६% पेक्षा ज्यास्त झाला नाहीं, आणि वर्ष अखेर इंडेक्समध्यें २% ची वाढ झाली. अर्थात, वेगवेगळ्या जिनसांचे भाव कमी–अधिक वर–खाली गेले. मार्च, १९५२ तें सप्टेंबर १९५२ अखेर किंमती चढत गेल्या. पुढें साडेतीन महिने त्या खाली जात चालल्या आणि नंतर त्या एप्रिलच्या मध्यापर्यंत पुनः एकसारख्या चढत गेल्या. त्यानंतरहि औद्योगिक कच्चा माल व खाद्यपदार्थ ह्यांच्या किंमतींत बरीच वाढ एकसारखी होत आहे. ११ एप्रिल, १९५३ ते ३० मे, १९५३ ह्या मुदतींत, सात आठवड्यांत, खाद्यपदार्थांच्या किंमतींत ७% व औद्योगिक कच्च्या मालाच्या किंमतींत ११% वाढ झालेली आहे. गूळ आणि भुइमूग ह्यांची किंमत एप्रिल १९५१ मधील किंमतीच्या बरोबरीची झाली आहे. उत्पादनांत घट परंतु मागणीचें सातत्य, ह्यांचा परिणाम साठेबाजींत होऊन त्यामुळें किंमती आणखी वाढूं लागतात.

गेल्या दोन वर्षांच्या ह्या आढाव्यावरून असें दिसून येतें कीं, इतर कित्येक देशांपेक्षा भारतांतील किंमतींनीं जास्त स्थिरता दाखविली आहे. सरकारच्या नाणेंविषयक धोरणामुळें सोडतीच्या व्यवहारांसाठी असलेली पैशाची मागणी उतरली व साठेहि कमी झाले. उत्पादनवाढीमुळें कांहीं प्रकारच्या मालाचा तुटवडा कमी झाला. परराष्ट्रीय मागणी उतरली आहे. ह्या सर्वांचा परिणाम म्हणजे, औद्योगिक कच्च्या मालास व निर्गत होणाऱ्या मालास असलेली अनुकूलता नष्ट झाली आहे. व्यापारी पिकांचें उत्पादन त्यामुळें किती कमी झालें आहे व दुष्काळी परिस्थितीचा तो किती परिणाम आहे, हें निश्चित सांगतां येणार नाहीं. इतर देशांतील किंमती घटण्याचीं स्पष्ट चिन्हें दिसत असतांना, भारतांत किंमती वाढत आहेत, ह्याकडे रिझर्व्ह बँकेचें लक्ष आहे आणि योग्य वेळीं योग्य उपाययोजना केली जाईल अशीं अपेक्षा आहे.

---

**अमेरिकन विमान कंपन्या**—अमेरिकन विमान कंपन्या येत्या ६ ते ८ वर्षांत १ अब्ज डॉलर्स खर्च करून नवीं विमानें चालू करणार आहेत. निरनिराळ्या उंचीवर वेगवेगळ्या प्रकारचीं विमानें चालू करण्यांत येणार आहेत.

## विणकामासारखा जोडधंदा सुरू करण्याची दिशा

ग्रामीण विकासयोजनांच्या यशाच्या दृष्टीनें खेडेगांवांतून बैठे उद्योगधंदे सुरू करणें आवश्यक आहे. हिंदमध्यें ७० टक्के लोक उपजीविकेसाठी केवळ शेतीवर अवलंबून असले तरी यांपैकी पुष्कळशा लोकांना वर्षांतून पांच सहा महिने विशेष कांहीं काम नसतें. कांहीं वेळां हे लोक मुंबई सारख्या ठिकाणीं हंगामी नोकरीला जाणें, भाजीपाला करणें, गांवांतच मजुरी करणें इ. व्यवसाय करतांना आढळतात परंतु यांत निश्चितपणा कांहींच नसतो. अशा ठिकाणीं विशेषतः हातमागावर कापड विणणें यासारखा धंदा ग्रामीण-विकास योजनांमार्फत सुरू केला, तर तें परिणामीं फायदेशीर ठरेल असें वाटतें. कुलाबा जिल्हा भातशेतीविषयीं प्रसिद्ध आहे. परंतु तेथें भाताचें पीक वर्षांतून एकदांच काढतात व पुष्कळ गांवांतून बैठे किंवा जोड उद्योगधंदे जवळजवळ नाहींतच. अलिबाग तालुक्यांत आवास व किहीम या दोन मोठ्या गांवांच्या दरम्यान 'थळयाचा पाडा' म्हणून ठिकाण आहे व तेथें दहा अकरा घरें आहेत. हे लोक खंडानें भातशेती करतात व कोळी असल्यामुळें कांहीं वेळां गलबतावर नोकरीला जातात. परंतु अगदीं अलिकडे मे १९५३ मध्यें चौकशी केली असतां असें आढळून आलें कीं, या लहानशा ठिकाणीं निदान पांच महिने सात किंवा आठ लोक रिकामे असतात. कोणत्याहि निश्चित व्यवसायाच्या अभावीं हे लोक पांच महिने रिकामेच राहातात. या लोकांचे श्रम सकारणीं लावावयाचे तर तेथें निदान दोन हातमाग चालवितां येतील. सवडीनुसार लोकांना मागावर काम करतां येईल. प्रत्येकानें रोज ४ तास मागावर काम केलें तरी त्याला निदान आठ आणे मजुरी रोज सुटूं शकेल. म्हणजे पांच महिने मागावर रोज ४ तास काम करून ७५ रु. एका माणसाला मिळवितां येतील. याप्रमाणें या लहानशा ठिकाणांतील ८ माणसांना वर्षाला ६०० रु. मिळवितां येतील.

ही योजना व्यवहारांत कशी आणावी हा प्रश्न आहे. खेडेगांवांतील परिस्थितीची निश्चित कल्पना रेव्हिन्यु खात्यांतील लोकांना, विशेषतः तलाठी व सर्कल इन्स्पेक्टर्स यांना असते. कोणत्या गांवांत हातमागासारखा व्यवसाय जोडधंदा म्हणून सुरू करतां येईल हें रेव्हिन्यू खात्याला ठरवितां येण्यासारखें आहे किंवा सध्यां सुरू असलेल्या ग्रामीण विकासयोजनांच्या अधिकाऱ्यांनाहि आपापल्या केंद्रांतून हातमागाचा जोडधंदा कोठें सुरू करतां येईल हें अजमावितां येण्यासारखें आहे. या दृष्टीनें हा प्रश्न विचारांत घेतला पाहिजे. अशाप्रकारें एखाद्या गांवांत विणकामाचा जोडधंदा सुरू करावयाचा तर विणकाम जाणणाऱ्या एखाद्या विणकराला त्या गांवांत एक किंवा दोन हातमाग ताब्यांत देऊन सरकारनें नेमावें. विणकरवर्गांतील आजची बेकारी लक्षांत घेतां सरकारला या कामासाठी लायक कोष्टी मिळूं शकतील. येथें केलेली सूचना अगदीं क्षुल्लक वाटली तरी अशा तऱ्हेचें धोरण हिंदमधील ५॥ लक्ष खेडेगांवांतील जास्तींत जास्त खेडेगांवांतून सुरू केलें गेलें तर त्याचा आर्थिक दृष्ट्या चांगला परिणाम निश्चित होईल.

---

### सूर्याचे फोटो घेणार

पृथ्वी व सूर्य ह्यांचेमध्यें ९,३०,००,००० मैल अंतर आहे. त्यांपैकी १५ मैल अंतर तोडून वर जाऊन सूर्याचे फोटो घेण्याची तयारी ब्रिटिश शास्त्रज्ञांनीं चालविली आहे. १५ मैल वर एक बलून पाठविण्यांत येईल, त्यांत ठेवलेला कॅमेरा फोटो घेईल. प्रिस्टन विद्यापीठांतील शास्त्रज्ञांनीं बलूनची योजना केली आहे.


१९५० अखेरचें ११ वें यशस्वी मूल्यमापन

१९५० मध्येंही रु. २६५ लाखांवर नवीन विम्याचें पूर्ण काम.

वेस्टर्न इंडिया विमा कंपनीनें आपलें सामर्थ्य, स्थैर्य व सेवा यासंबंधींची प्रचिती पुन्हां एकवार विमा जगतास आणून दिली आहे.

दर हजारी त्रैवार्षिक बोनस

| इयातींतील पॉलिसी | इयातीनंतरची पॉलिसी |
|---|---|
| रु. २७ | रु. ३३ |

कंपनीच्या वाढत्या वैभवांत सहभागी व्हा व सर्वोत्कृष्ट फायद्यासाठी वेस्टर्न इंडियाची निवड करा.

के. वाय. जोशी, बी. ए., एफ. आय. ए.
मॅनेजर

वेस्टर्न इंडिया लाईफ
इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा.

शाखा कचेरीः— शहर: १७९ बुधवार पेठ, लक्ष्मीरोड, पुणें. कॅंप: केअर-ऑफ क्रेसवेल्स ईस्ट स्ट्रीट, पुणें-१
फोन नंबर— ३४०२

दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक

शाखाः—संकेश्वर, होसूर (पो. शहापूर), गोकाक, कॅंप (बेळगांव), वेंगुर्ले, मालवण, नंदगड, गडहिंग्लज, रामदुर्ग, चिकोडी, नरगुंद, शिरोडा, चिपळूण, कणकवली, निपाणी, बैलहोंगल, मिरज, अथणी, देवगड, सावंतवाडी, ठळकवाडी (बेळगांव), सौंदत्ती.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. | १,९०,००० |
| ठेवी | रु. | ७९,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ९२,९२,००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतीमध्यें अद्ययावत पद्धतीचा सेफडिपॉझिट व्हॉल्ट १० एप्रिल, १९५३ पासून सुरू झाला.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

जी. एल. गजेंद्रगडकर, चेअरमन.
ए. आर. नाईक, मॅनेजिंग डायरेक्टर.
एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. ११ जुलै, १९५३





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## गेल्या दोन वर्षांतील किंमतीमधील चढउतार

### सध्याच्या वाढत्या महागाईचें कारण काय ?

गेल्या दोन वर्षांत, भारतांतील जिनसांच्या किंमतींचे बाबतींत खालील तीन गोष्टी दिसून आल्याः—( १ ) पहिल्या बारा महिन्यांत किंमतींत २१% उतार झाला. ( २ ) पुढील नऊ महिन्यांत किंमतींची पातळी साधारणपणें स्थिर राहिली; मात्र वेगवेगळ्या जिनसांतील चढ-उताराचें प्रमाण वेगवेगळें होतें. ( ३ ) १९५२–५३ च्या शेवटच्या तिमाहीपासून किंमती चढत गेल्या आहेत. रिझर्व्ह बँकेच्या संबंधित खात्यांनीं ह्याबाबत रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया बुलेटिनमध्यें एकत्रित माहिती प्रसिद्ध केली आहे.

कोरियन युद्धामुळें किंमती एकदम भडकल्या, त्या खाली येण्याची प्रवृत्ति सबंध जगांतच सगळीकडे होती. ती प्रवृत्ति भारतांतहि आढळली. बाहेरच्या ह्या व्यापक कारणाबरोबर, दोन अंतर्गत कारणांचा भारतांत अंमल होता, त्यांपैकी पहिलें कारण १९५१ अखेर अंगीकारलेलें नाणेंविषयक धोरण व दुसरें कारण पंचवार्षिक योजनेची अंमलबजावणी. ह्या कारणांमुळें किंमती, उत्पादन, आयात व साठा ह्या सर्वांसच नवें वळण लागलें.

कोरियन युद्धापूर्वीच्या मानानें एप्रिल १९५१ मधील किंमती भारतांत १६% नें वाढल्या. अमेरिकेंत किंमतवाढ त्याच प्रमाणांत, तर ग्रेट ब्रिटनमध्यें ती ३०% नीं जास्त झाली. इतर कित्येक देशांतील वाढीचें प्रमाण ह्यापेक्षाहि जास्त होतें. भारतांतील किंमतवाढींत औद्योगिक कच्च्या मालाची किंमत सर्वांत जास्त (४०%) वाढली. बँक रेट वाढविल्यावर हिंदी किंमतींची पातळी २·६% उतरली, आणि १९५२ च्या प्रारंभीं कोरिअन सरासरी किंमतीपेक्षा ती पातळी फक्त १०% नें वरती होती. तुलनेनें पहाता, अमेरिकन किंमती १४% नें व ब्रिटिश किंमती ३०% नें चढीच्या होत्या.

कोरिअन युद्धचलतीमुळें, जागतिक तुलनेनें हिंदी घाऊक किंमतींत वाढ जरा बेतानेंच झाली, तरी वैयक्तिक जिनसांच्या किंमती एकाच गतीनें वाढल्या नाहींत. आंतरराष्ट्रीय बाजारांत कच्चें रबर व कच्ची लोकर ह्यांच्या किंमती अनुक्रमें २१५% व १६३% वाढल्या. त्यामानानें भारताच्या तागाच्या किंमतींमधील १५७% वाढ बरीच कमी होती. कच्च्या तागाखेरीज बाकी हिंदी मालाच्या किंमती फार कडाडल्या नाहींत. त्यांत कच्च्या कातड्यांच्या किंमतीच्या वाढीचा उच्चांक (८६%) होता. भारतांत किंमती उतरण्यास प्रारंभ मात्र उशीरा झाला. ताग व इतर निर्गत होणाऱ्या मालास परदेशांत असलेली प्रचंड मागणी, हें त्याचें कारण होतें.

१९५१–५२ मध्यें, पूर्वीच्या वर्षांच्या मानानें शेतीचें उत्पादन किंचित सुधारलें. औद्योगिक उत्पादन मात्र १२% वाढलें. १९५१ च्या अखेरीस त्यांत विशेष वाढ झाली. ह्या उत्पादनवाढीस कापड, लोखंड आणि पोलाद ह्यांनीं विशेष हातभार लावला. अंतर्गत उत्पादनांतील वाढ व परराष्ट्रीय व्यापारांत आयातीचें वर्चस्व, ह्यांमुळें जिनसांचा पुरवठा समाधानकारक राहिला.

पुरवठ्याच्या बाजूनें वरील गोष्टी किंमतीस खाली ओढूं लागल्या, तर मागणीच्या बाजूनें १९५१–५२ च्या मोसमाचे आरंभीं अंमलांत आणलेलें नाणेंविषयक धोरण खेचूं लागलें. सोडतीच्या स्वरूपाच्या साठेबाजीस हें धोरण मारक ठरलें. बिल मार्केट योजनेमुळें खऱ्या व्यापारी व्यवहारांची कुचंबणा झाली नाहीं आणि कर्जाऊ पैशाचा तुटवडा असा भासला नाहीं. फेब्रुवारी, १९५२ चे अखेरीस किंमती खाली येऊं लागल्या आणि मार्च १९५२ मध्यें किंमतींचा इंडेक्स ३७४·९ वर आला. एप्रिल, १९५१ मध्यें तो ४६२·० होता; म्हणजे उतार २१% झाला.

घाऊक मालाच्या किंमतीचा इंडेक्स एप्रिल, १९५२—मार्च, १९५३ ह्या मुदतींत साधारणतः स्थिर राहिला; एकूण चढउतार ६% पेक्षा ज्यास्त झाला नाहीं, आणि वर्ष अखेर इंडेक्समध्यें २% ची वाढ झाली. अर्थात, वेगवेगळ्या जिनसांचे भाव कमी–अधिक वर–खाली गेले. मार्च, १९५२ तें सप्टेंबर १९५२ अखेर किंमती चढत गेल्या. पुढें साडेतीन महिने त्या खाली जात चालल्या आणि नंतर त्या एप्रिलच्या मध्यापर्यंत पुनः एकसारख्या चढत गेल्या. त्यानंतरहि औद्योगिक कच्चा माल व खाद्यपदार्थ ह्यांच्या किंमतींत बरीच वाढ एकसारखी होत आहे. ११ एप्रिल, १९५३ ते ३० मे, १९५३ ह्या मुदतींत, सात आठवड्यांत, खाद्यपदार्थांच्या किंमतींत ७% व औद्योगिक कच्च्या मालाच्या किंमतींत ११% वाढ झालेली आहे. गूळ आणि भुइमूग ह्यांची किंमत एप्रिल १९५१ मधील किंमतीच्या बरोबरीची झाली आहे. उत्पादनांत घट परंतु मागणीचें सातत्य, ह्यांचा परिणाम साठेबाजींत होऊन त्यामुळें किंमती आणखी वाढूं लागतात.

गेल्या दोन वर्षांच्या ह्या आढाव्यावरून असें दिसून येतें कीं, इतर कित्येक देशांपेक्षा भारतांतील किंमतींनीं जास्त स्थिरता दाखविली आहे. सरकारच्या नाणेंविषयक धोरणामुळें सोडतीच्या व्यवहारांसाठीं असलेली पैशाची मागणी उतरली व साठेहि कमी झाले. उत्पादनवाढीमुळें कांहीं प्रकारच्या मालाचा तुटवडा कमी झाला. परराष्ट्रीय मागणी उतरली आहे. ह्या सर्वांचा परिणाम म्हणजे, औद्योगिक कच्च्या मालास व निर्गत होणाऱ्या मालास असलेली अनुकूलता नष्ट झाली आहे. व्यापारी पिकांचें उत्पादन त्यामुळें किती कमी झालें आहे व दुष्काळी परिस्थितीचा तो किती परिणाम आहे, हें निश्चित सांगतां येणार नाहीं. इतर देशांतील किंमती घटण्याचीं स्पष्ट चिन्हें दिसत असतांना, भारतांत किंमती वाढत आहेत, ह्याकडे रिझर्व्ह बँकेचें लक्ष आहे आणि योग्य वेळीं योग्य उपाययोजना केली जाईल अशी अपेक्षा आहे.

**अमेरिकन विमान कंपन्या**—अमेरिकन विमान कंपन्या येत्या ६ ते ८ वर्षांत १ अब्ज डॉलर्स खर्च करून नवीं विमानें चालू करणार आहेत. निरनिराळ्या उंचीवर वेगवेगळ्या प्रकारचीं विमानें चालू करण्यांत येणार आहेत.

## विदेशी कारखानदारांची तरफदारी का ?

### श्री. ग. रा. साठे, ह्यांचें पत्र

संपादक " अर्थ " पुणें.

न. वि. वि.

" कॉमर्स "च्या १३ जूनच्या अंकांत हिंदी साबणाच्या धंद्यावर पृ. १०९२ वर एक लेख आला आहे, त्यांतील विचाराची पद्धति चुकीची आहे. कांहीं गोष्टींकडे दुर्लक्ष करण्यांत आलें आहे व कांहींचा विपर्यास करण्यांत आला आहे. सध्या भारतांत चाल असलेल्या कोणत्याहि विदेशी कारखान्यास उत्पादन बंद करण्यास लावणें चुकीचें होईल, ह्याबद्दल वाद नाहीं. परंतु त्यांना भरमसाट वाढूं देण्यास परवानगी देणें इष्ट नाहीं. अशा वाढीमुळें लक्षावधि रुपये ज्यांत गुंतलेले आहेत, अशा इतर देशी कारखान्यांच्या अस्तित्वावर कुऱ्हाड कोसळण्याचा संभव आहे आणि योजनाबद्ध प्रगतीच्या तें मुळावरच येईल. सरकारनें एकाद्याच, आणि त्याहि विदेशी, कारखान्याला लक्षावधि रुपयांची नवी यंत्रसामुग्री आयात करण्याची परवानगी देऊन, अस्तित्वांत असलेल्या कारखान्यांचें उत्पादन बंद पाडणें व त्यांत गुंतलेलें भांडवल निकामी करणें शहाणपणाचें होणार नाहीं. इंडस्ट्रीज कंट्रोल बिलासारख्या कायद्यांची मग आवश्यकता काय होती ?

साबणाच्या धंद्याप्रमाणेंच वनस्पति, टॉयलेट्स, बिस्किटें, कोको–चॉकोलेटस, शाई, मशीन-टूल्स, इत्यादि धंद्यांचीहि परिस्थिति आहे. परदेशी भांडवलाच्या आवश्यकतेबद्दल कोणाचाच मतभेद नाहीं. परंतु, त्या भांडवलानें भारताच्या आर्थिक उद्धारासाठी यावें; आधीं गुंतलेलें भांडवल नष्ट करण्यासाठी नव्हे; नाहींतर दोन्ही बाजूंनीं नुकसान व्हावयाचें. सरकारच्या जाहीर धोरणाविरुद्ध ही गोष्ट असून, त्यांत वैयक्तिक हितसंबंधांच्या गुंतागुंतीचा वास येतो, असें म्हटलें पाहिजे.

दि साठे बिस्किट अँड चॉकोलेट कं. लि. पुणें. २
१८ जून, १९५३ — ग. रा. साठे

### परदेशीयांस आकर्षण्यासाठी स्वतःला मारक होणारी योजना नको

"विदेशी कारखानदारांची तरफदारी का ?" ह्या शीर्षकाखाली श्री. ग. रा. साठे ह्यांचें पत्र प्रसिद्ध केलें आहे; त्यांत त्यांनीं एका तातडीच्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्याची महत्त्वाची कामगिरी केली आहे. विदेशी कंपन्या देशी कंपन्यांपेक्षा अधिक कार्यक्षम व संपन्न असल्यानें, त्यांचे हातपाय येथें पसरूं न देतां हिंदी कंपन्या त्यांच्या तोडीच्या कशा करतां येतील, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. " कॉमर्स " सारख्या मुंबईच्या आर्थिक वृत्तपत्रानें विदेशी साबण कारखानदारांची बाजू घ्यावी, हें चमत्कारिक दिसतें. श्री. साठे ह्यांनीं दाखवून दिल्याप्रमाणें, हिंदी कारखान्यांत गुंतलेलें भांडवल नष्ट होण्याचा ज्या योजनेंत संभव आहे ती कोणतीहि योजना आपल्या कारखानदारीच्या हिताची होणार नाहीं. भारतांत भांडवलाचा तुटवडा असतांना, गुंतवलेलें भांडवल नाहींसें होऊं देणें योग्य होणार नाहीं. परदेशी कंपन्यांना येथें किती वाव द्यावा, ह्या प्रश्नाचा विचार करतांना ही गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. परदेशी भांडवलाला आकर्षक होणाऱ्या गोष्टी आपल्या भांडवलास मारक होता कामा नयेत, हें उघड आहे.

काँग्रेस वर्किंग कमिटीच्या इकॉनॉमिक सब कमिटीनें, सरकारच्या प्रस्तुत धोरणाच्या अनिष्टतेबद्दल स्पष्ट मत व्यक्त केलें आहे. साबण, बिस्किटें, फळांचे बंद डबे, डेअरींत तयार होणाऱ्या जिनसा, इत्यादि जिनसांच्या कारखान्यांत मोठ्या प्रमाणावर हिंदी भांडवल गुंतलेलें असतांना, भारतांतील परदेशी मालकीच्या कारखान्यांची वाढ करण्यासाठी परदेशी भांडवलास येऊं देणें सब कमिटीच्या मतें योग्य नाहीं. देशी कारखानदारांना सवड दिल्यास त्यांचें उत्पादन सहज वाढूं शकेल. कलकत्त्याच्या नॅशनल चेंबर ऑफ कॉमर्सनें, परदेशी कंपनीस साबणाचें उत्पादन वाढविण्यास परवानगी देण्याच्या प्रश्नावर अशीच टीका केली आहे. भारतीय कारखानदारांच्या एकमेकांतील स्पर्धेमुळें, त्यांच्या मालाची किंमत आपोआप उतरेल; गिऱ्हाईक वर्गास फार काळ नुकसान सोसावें लागणार नाहीं.

### हिंदी साबण कारखानदारांची विदेशी कारखान्याविरुद्ध तक्रार

एका प्रसिद्ध विदेशी साबण कारखानदाराविरुद्ध हिंदी साबण कारखानदारांची तक्रार आहे, तिचेवर " कॉमर्स " साप्ताहिकानें व्यक्त केलेले विचार चिंतनीय आहेत. " हा विदेशी कारखाना भारतांत उभारलेल्या सर्व कारखान्यांत मोठा आहे; कारखान्यांच्या आंतरराष्ट्रीय साखळींतील तो एक दुवा आहे. त्याचें भांडवल प्रचंड असून फार मोठ्या प्रमाणावर तो व्यवहार करूं शकतो. तीन पाळ्या चालवून हा कारखाना सालिना ६०,००० टन साबण तयार करीत आहे. ह्या कारखान्याच्या स्पर्धेमुळें हिंदी कारखान्यांची उत्पादनशक्ति पुऱ्या प्रमाणांत उपयोगांत येऊंच शकत नाहीं. विदेशी कारखान्याच्या पुनर्रचनेसाठी २७ लक्ष रुपयांची नवी यंत्रसामुग्री आयात करण्यासाठी तो कारखाना भारत सरकारकडे मंजुरी मागीत आहे. ह्या पुनर्रचनेची राष्ट्रीय दृष्ट्या व विशेषतः हिंदी साबणाच्या धंद्याच्या दृष्टीनें बिलकूल आवश्यकता नाहीं. विदेशी कारखान्यास यंत्रसामुग्री आणण्यास परवानगी देतां कामा नये व उत्पादनाची वाटणी अशा तऱ्हेनें केली पाहिजे, कीं वेगवेगळ्या कारखान्यांची यंत्रसामुग्री बंद राहूं नये " अशी हिंदी कारखानदारांची मागणी आहे.

" भारतांतील विदेशी कारखान्यांकडे बघण्याचा हा दृष्टिकोन साबण कारखानदारांपुरताच मर्यादित नाहीं. लोकांच्या गरजापेक्षा कारखानदारांचा स्वार्थी हेतूच त्याच्या बुडाशीं आहे. अनिष्ट स्पर्धेबद्दल सबळ पुरावा साबण कारखानदारांनीं पुढें आणलेला नाहीं. गिऱ्हाइकला परवडेल अशा किंमतींत उत्पादन करून त्याची विक्री करण्याची कला अवगत असणाऱ्या सर्व कारखानदारांस पुरेसा वाव आहे. ज्यांना हें साधत नाहीं, त्यांचें उत्पादन न परवडणारें किंवा अकार्यक्षम पद्धतीचें असलें पाहिजे. कार्यक्षम कारखानदारांना अडथळा करण्याचें साबण कारखानदारांचें धोरण असमर्थनीय आहे. परदेशी साबण कारखाना बंद पडणें भारताच्या हिताचें नाहीं. बेकारींत भर, उत्पादनांत घट व साबणाच्या किंमतींत वाढ, असा त्याचा परिणाम होईल. देशाच्या हिताच्या दृष्टीनें, वापरता येण्याजोगी यंत्रसामुग्री गंजूं दिल्यानें बंद पडणाऱ्या यंत्रसामुग्रीचा प्रश्न सुटणार नाहीं. परदेशी कारखान्यास अयोग्य प्रकारें वागविलें, तर परदेशी भांडवल भारतांत येण्यास कचरेल. मोठ्या कारखान्यांविरुद्ध इतर कारखाने तक्रार करतात, मग ग्रामोद्योगाच्या स्वरूपांत साबण तयार करणारांनाहि संरक्षण नको काय? घाणींची ऑईल मिल्स विरुद्ध तक्रार सुरू आहे; उद्यां पादत्राणाच्या कारखान्यांनीं वहाणा करूं नयेत असें खेडेगांवांतील चांभार म्हणूं लागतील! साबणाचा एक मोठा कारखाना बंद पाडल्यानें साबण–कारखानदारांचा प्रश्न सुटणार नसून, मागणीप्रमाणें उत्पादन करणें हाच त्यावर उपाय आहे " असें " कॉमर्स " कारांनीं विदेशी साबण कारखान्याच्या उत्पादनवाढीचें समर्थन केलें आहे.

## भारतांतील १९५२ मधील बँकिंग

"ट्रेन्ड अँड प्रोग्रेस ऑफ बँकिंग इन् इंडिया" हें रिझर्व्ह बँकेचें वार्षिक नुकतेंच प्रसिद्ध झालें आणि आतां "स्टॅटिस्टिकल टेबल्स रिलेटिंग टू बँक्स इन् इंडिया फॉर दि इयर १९५२" हें वार्षिक प्रसिद्ध झालें आहे. प्रस्तुत प्रकाशनांत भारतांत काम करणाऱ्या बँकांबाबत (त्या भारतांत नोंदलेल्या असोत, वा नसोत) माहिती देण्यांत येत असते. ह्या माहितीच्या तक्त्यांची दोन भागांत वांटणी केलेली आहे:—सारांश व तपशील. वरील दोन्ही प्रकाशनांतील द्विरुक्ति टाळण्यासाठी "स्टॅटिस्टिकल टेबल्स" बँकांच्या ताळेबंदापुरती मर्यादित ठेवलीं आहेत व "ट्रेन्ड अँड प्रोग्रेस" मध्यें कायद्याच्या विविध कलमाखालीं रिझर्व्ह बँकेकडे एकत्रित होणारी माहिती दिलेली आहे. प्रकाशनाची उपयुक्तता वाढविण्यासाठी त्यांत सालोसाल सुधारणा करण्यांत आली आहे.

१९५२ मध्यें भारतांतील जॉइंट स्टॉक बँक-कचेऱ्यांची संख्या आणखी १४८ नें उतरली. बिगर-शेड्यूल्ड बँकांनीं कचेऱ्या बंद केल्या किंवा स्वतःचें बिगर-बँकिंग कंपन्यांत रूपांतर केलें, त्याचाच मुख्यतः हा परिणाम आहे. पाकिस्तानांतील कचेऱ्या हिंदी बँकांनीं बंद केल्या. त्यामुळें हिंदी बँकांच्या भारताबाहेरील कचेऱ्यांची संख्या २० नें कमी होऊन ती १०६ वर आली. सहकारी बँकांची संख्या व त्यांचें बँकिंग क्षेत्रांतील महत्त्व हळूहळू वाढत चाललें आहे. १९५२ मध्यें हिंदी शेड्यूल्ड बँकांचें उत्पन्न ३४·३ कोटी व खर्च २६·३ कोटी रु. झाला; म्हणजे १९५१ चे मानानें अनुक्रमें २·१ कोटी व २·४ कोटी रु. ची वाढ झाली. ज्यास्त व्याजाच्या दरानें दिलेल्या कर्जांचा व वाढत्या नोकरवर्गाच्या पगाराचा तो परिणाम आहे.

* इतर रोख्यांवरील व्याज, बँकांतील ठेवींवरील व्याज, पूर्वी लिहून टाकलेल्या जिंदगीची वसुली, बिल्स फॉर कलेक्शन, विकलेले टी. टी., डी. डी., इत्यादींवरील कमिशन, वगैरेंचे आकडे वगळले आहेत.

ऽ कर, घसारा, इत्यादींचे आकडे वगळले आहेत.

### हिंदी शेड्यूल्ड बँकांचा उत्पन्न-खर्च १९४८ ते १९५२

(आकडे लक्ष रुपयांचे)

| | १९४८ | १९५० | १९५२ |
|---|---|---|---|
| उत्पन्न* | | | |
| कर्जें इ. वर व्याज, कमिशन इ. | १४७७ | १५१३ | २०२७ |
| सरकारी रोख्यांवरील व्याज | ९८८ | ८११ | ६८४ |
| एकूण | २९७३ | २९१० | ३४३८ |
| खर्चऽ | | | |
| ठेवींवरील व्याज | ६९८ | ६२६ | ७८५ |
| कर्जांवरील व्याज | ५४ | ४८ | १०४ |
| एस्टॅब्लिशमेंट खर्च | ९५० | ११२४ | १२८४ |
| इतर खर्च | ३४९ | ३३९ | ४०० |
| निव्वळ नफा | ८०७ | ६५८ | ७४३ |
| एकूण | २९७३ | २९१० | ३४३४ |
| **नफा वांटणीसाठी रक्कम** | | | |
| निव्वळ नफा | ८०७ | ६५८ | ७४३ |
| मागील शिलकी नफा | १२२ | ६४ | ५२ |
| रिझर्व्ह मधून | ८ | २१ | २१ |
| एकूण | ९३७ | ७४३ | ८१६ |
| **नफा वांटणी** | | | |
| करासाठी तरतूद | २४० | १६४ | २०५ |
| रिझर्व्ह फंडांत | ९९ | ६३ | ६२ |
| भागिदारांना डिव्हिडंड व बोनस | २३९ | २४५ | १५६ |
| नोकरांना बोनस (नफ्यांतून) | ८८ | १०० | १०७ |
| इतर कारणांसाठी तरतूद | १७५ | ११६ | १५७ |
| पुढील हिशेबांत ओढले | ९५ | ५२ | २७ |
| एकूण | ९३७ | ७४३ | ८१६ |

### पंजाबमधील सहकारी बँका

पंजाबमधील सहकारी खात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची एक बैठक नुकतीच सिमला येथें भरविण्यांत आली होती. सहकारी खात्याच्या कामांत वाढ झाल्यामुळें जॉइंट रजिस्ट्रारच्या तीन नव्या जागा निर्माण करण्यांत याव्या आणि सहकारी सोसायट्यांतर्फे देण्यांत येणाऱ्या कर्जांवरील व्याजाचा दर कमी करण्यांत यावा असे दोन निर्णय घेण्यांत आल्याचें समजतें. राज्यांतील सहकारी बँकांना रिझर्व्ह बँकेनें, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिआ ॲक्टच्या १७ व्या कलमाखालीं कर्जें द्यावीं म्हणून पंजाब सरकार भारतीय सरकारला आग्रह करीत आहे असें समजतें. वरील कलमाखालीं देण्यांत येणाऱ्या व्याजावर दरसाल दरशेंकडा १॥ टक्काच व्याज घेण्यांत येतें. उलटपक्षीं, रिझर्व्ह बँकेनें राज्य-सरकारला असें कळविलें आहे कीं, को-ऑपरेटिव्ह बँकांच्या भांडवलाच्या रचनेंत सुधारणा घडवून आणल्यासेरीज अशा तऱ्हेचीं कर्जें देणें शक्य होणार नाहीं. पंजाब सरकार राज्यांतील सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेसाठी २५,००,००० रुपयांचें भांडवल उभारण्याचा प्रयत्न करीत आहे. त्याचप्रमाणें जिल्हा सहकारी बँकांसाठींहि ३,००,००० रुपयांचें भांडवल उभारण्याचे प्रयत्न सुरू आहेत. चालू आर्थिक वर्षांत सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेचे १०,००,००० रुपयांचे भाग सरकारनें विकत घ्यावयाचें ठरविलें आहे आणि १९५४-५५ ह्या आर्थिक वर्षांत आणखी ५ लाखांचे भाग विकत घेण्याचा सरकारचा मानस आहे. एकूण २५ लाख रुपये भांडवलापैकी १५ लाख रुपये भांडवल जर राज्य-सरकारनें स्वतः उभारलें तर बाकीचें १० लाख रुपये भांडवल सार्वजनिकरीत्या उभारलें जाण्यास अडचण पडूं नये, असा विश्वास सरकारला वाटत असावा. रिझर्व्ह बँकेकडून मिळूं शकणाऱ्या कर्जांविषयीं राज्य सरकारचा भारतीय सरकारशीं विचारविनिमय चालू आहे.

**रेल्वेचे आणखी डबे आले**—स्वित्झरलंडकडून भारतीय रेल्वेनें मागविलेल्या प्रवासी डब्यांपैकी आणखी ४ डबे नुकतेच मुंबई बंदरांत येऊन दाखल झाले. आतांपर्यंत २० डबे आले असून चालू वर्षअखेर आणखी ३० येतील. सेंट्रल रेल्वेसाठी ५० डबे देण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे.

## ब्रिटनला रशिआकडून प्लॅटिनमचा पुरवठा

लंडनच्या बाजारांत १००० औंस प्लॅटिनम विकण्याची इच्छा रशिआनें प्रदर्शित केली असून त्यामुळें बरीच खळबळ उडाली आहे असें समजतें. लंडनच्या खुल्या बाजारांत धातूंची विक्री करणाऱ्या दलालांचें मत ह्याविषयीं पुढीलप्रमाणें आहे. सध्या बाजारांत प्लॅटिनमची किंमत दर औंसामागें ३४ पौंड आहे. तीवर रशिअन प्लॅटिनम बाजारांत आल्यास परिणाम झाल्याशिवाय रहाणार नाहीं. शिवाय वायदे करण्याची प्रवृत्ति वाढीस लागूनहि किंमतीवर परिणाम होईलच. तथापि रशिआला लंडनच्या बाजारांत प्लॅटिनम विकावयाचें असेल तर ह्या व्यवहाराला प्रथम ब्रिटिश सरकारची संमति घ्यावी लागेल. अशी संमति मिळाल्याशिवाय रशिआचें प्लॅटिनम बाजारांत येऊंच शकणार नाहीं. अधिक प्लॅटिनम बाजारांत आल्यामुळें किंमती घसरण्याचा संभव आहे, हें जरी खरें असलें तरी पुरवठा वाढल्यामुळें ब्रिटिश उद्योगधंद्यांना अधिक प्लॅटिनम मिळूं शकेल. ब्रिटिश सरकारनें जरूर ती परवानगी दिली तर ती ह्याच कारणासाठी दिली जाण्याचा संभव आहे. मात्र जरूर लागेल तेवढें प्लॅटिनम देशांत ठेवून बाकीच्याची विल्हेवाट लावण्याचें स्वातंत्र्य ब्रिटन राखून ठेवील असा अंदाज आहे. आपली गरज भागून उरलेलें प्लॅटिनम ब्रिटन परकीय हुंडणावळीसाठी विकूं शकलें तर त्यांत ब्रिटनचा फायदाच आहे. विशेषतः डॉलर्सच्या बदला प्लॅटिनम विकता आल्यास चांगलेंच. ह्या व्यवहारापुरतें एक स्वतंत्र खातें उघडून रशिआला पौंडाच्या नाण्यांत किंमत देतां येईल सध्या लंडनच्या बाजारांत रोज सुमारें २०० औंस प्लॅटिनमची विक्री होत असते.

---

## भारतीय मालाबद्दल परदेशांच्या तक्रारी

भारताच्या परदेशाशीं चालणाऱ्या व्यापारावर लक्ष ठेवण्यासाठीं इंडिअन ट्रेड मिशन्स नेमण्यांत आलेलीं आहेत. परंतु ह्या मिशन्सच्या कांहीं पद्धती व्यापारी वृत्तीला न शोभण्यासारख्या आहेत अशी तक्रार करण्यांत येत आहे. त्याचप्रमाणें भारतामधून हस्तव्यवसायाचा जो माल पाठविण्यांत येतो, त्याचा दर्जा चांगला नसतो अशी कुरकूर परदेशी ग्राहक करीत असल्याचें समजतें. पं. नेहरू राज्यारोहणाच्या समारंभानिमित्त लंडनला गेले होते त्यावेळीं त्यांच्या बरोबर त्यांच्या कन्या मिसेस इंदिरा गांधी ह्या होत्या. पं. नेहरू झ्युरिक येथें थांबले होते त्यावेळीं एका स्विस व्यापारी स्त्रीनें मिसेस गांधी ह्यांची गांठ घेऊन आपल्या तक्रारी भारतीय सरकारच्या व्यापार खात्याच्या कानीं घालाव्या अशी विनंति केल्याची वार्ता आहे. मिसेस गांधी ह्यांचा सेंट्रल बोर्ड ऑफ कॉटेज इंडस्ट्रीजशीं संबंध आहे. वरील स्त्री-व्यापाऱ्यानें त्यांना असें सांगितलें कीं भारताची ट्रेड मिशन्स व्यापाऱ्याला न शोभणाऱ्या तऱ्हेनें व्यवहार करतात आणि युरोपांतील आयातीच्या व्यापाऱ्यांना परवडणार नाहींत अशा तऱ्हेच्या किंमती सांगतात. लखनौ येथील ग्रामोद्योगाशीं संबंध असलेल्या गटांनीं ह्या वृत्ताबद्दल कांहीं टीका केल्याचें ऐकिवांत नाहीं. पण त्यांच्याहि ट्रेड मिशनच्या कारभाराबद्दल कडवट तक्रारी आहेत असें समजतें. त्यांची तक्रार अशी आहे कीं मिशनमध्यें काम करणारे बरेच अधिकारी व्यापाराच्या पद्धतींविषयीं अशिक्षित असतात आणि त्यांना ते ज्या देशांत काम करतात त्या देशांमधील बाजारपेठांच्या दिशांबद्दल फारशी माहिती नसते. भारताचा परदेशी व्यापार वाढावयाचा असल्यास अशा तक्रारींची चौकशी होणें जरूर आहे.

## जंगलांपासून होणारें उत्पन्न व खर्च

अखिल भारतांतील जंगलांपासून एकरीं एक रुपयाहून कमी उत्पन्न होत आहे. १९५१ मध्यें देशांतील जंगलांपासून एकूण २३·४१ कोटी रुपये उत्पन्न आलें, तर त्यांवर एकूण ९·२७ कोटी रुपये खर्च झाला. यावरून जंगलांखालील १४·७ कोटी एकरांपासून १४·१४ कोटी रुपये निव्वळ उत्पन्न झाल्याचें दिसून येतें. निरनिराळ्या राज्यांच्या जंगल खात्यांच्या १९५३-५४ च्या अर्थसंकल्पांवरून मध्य प्रदेश, मुंबई व उत्तर प्रदेश या राज्यांतील जंगलविषयक उत्पन्न सर्वांत अधिक अपेक्षित असल्याचें दिसून येतें.

| | उत्पन्न ( लक्ष रु. ) | खर्च ( लक्ष रु. ) |
|---|---|---|
| मध्य प्रदेश | ३२१·६१ | ६५·०३ |
| मुंबई | ३२१·२४ | १२५·७५ |
| उत्तरप्रदेश | ३११·१६ | १२७·१३ |

मद्रास राज्याचे मुख्य मंत्री श्री. चक्रवर्ती राजगोपालचारी यांनीं कांहीं दिवसांपूर्वी सुचविल्याप्रमाणें रस्त्यांच्या बाजूला लावलेल्या झाडांपासून मिळूं शकणारे फायदे त्या शेजारच्या जमीनमालकास देण्यासंबंधींची एक योजना मध्यवर्ती शेतकी मंत्र्यांनीं राज्यसरकारांस सुचविली आहे.

---

## पडून राहिलेली इंजिनिअरिंग उत्पादनशक्ति

भारतांत इंजिनिअरिंग उद्योगांतील किती उत्पादनशक्ति पडून राहिली आहे, आणि उत्पादनपद्धतींत कार्यक्षमता कशी वाढवितां येईल, ह्याविषयीं सरकारला सल्ला देण्यासाठीं एक कमिटी नेमण्यांत आली आहे. तींत तीन सरकारी अधिकारी व चार बिन सरकारी सभासद आहेत. त्यांत टाटा कंपन्यांचे श्री. मुळगांवकर व किर्लोस्कर ऑइल एंजिन्सचे श्री. शंतनुराव किर्लोस्कर हीं नांवें आहेत.

---

## भारतांतील कागदाचें उत्पादन

१९५२ सालीं भारतांत १,३७,५०४ टन कागदाचें उत्पादन झालें. १९५५-५६ पूर्वीच पंचवार्षिक योजनेंतील वार्षिक २,००,००० टनांच्या उत्पादनाचें उद्दिष्ट गांठलें जाईल, अशी अपेक्षा आहे.

---

## सहकारी बँकांनीं घ्यावयाच्या ठेवी–नव्या सवलती

बॉंबे को. सोसायटीज रूल्समध्यें दुरुस्ती करण्यांत आली आहे. ह्या दुरुस्तीमुळें सेंट्रल बँक, बँकिंग यूनियन किंवा अर्बन बँक ह्यांना त्यांच्या "वसूल भांडवल, अधिक रिझर्व्ह फंड आधिक बिल्डिंग फंड, वजा सांचलेला तोटा" ह्या रकमेच्या बारा पट ठेवी व कर्जें घेतां येतील; रजिस्ट्रारची पूर्व-मंजुरी लागणार नाहीं. बॉंबे प्रॉ. को. लँड मॉर्गेज बँक व इतर प्राथमिक लँड मॉर्गेज बँका ह्यांना अशाच प्रकारें वीसपट ठेवी व कर्जें घेतां येतील.

---

**रेशमाच्या धंद्याविषयीं परिषद**—भारतामधील रेशमाच्या धंद्यापुढील प्रश्नांची चर्चा करण्यासाठीं भारतीय सरकार येत्या ऑक्टोबर अगर नोव्हेंबरमध्यें मुंबई येथें एक परिषद भरविणार असल्याचें समजतें. सेंट्रल सिल्क बोर्डानें ह्या धंद्याविषयीं १११ प्रश्न असलेलें एक परिपत्रक संबंधितांकडे आधींच पाठविलें आहे.

### ताडगूळ तयार करणाऱ्या सहकारी संस्था

ताडगुळाच्या उत्पादनासंबंधीं मध्यवर्ती सरकारला सल्ला देणारे श्री. गजानन नाईक ह्यांनीं चित्तूर–कोचीनला भेट देऊन त्या भागांतील ताडगुळाच्या सहकारी संस्थांचा तपशीलवार अभ्यास केला. ह्या प्रसंगीं ताडगूळ तयार करणाऱ्या सहकारी संस्थांनीं आपल्या अडचणी त्यांच्यापुढें मांडल्या. ताडगुळाचा हंगाम नसेल त्या वेळीं सुद्धां संस्थांच्या कचेऱ्यांतील नोकरवर्ग ठेवावा लागतो; त्यामुळे सर्वांत निष्कारण वाढ होते अशी तक्रार करण्यांत आली. संस्थांना जो फायदा होतो त्यांतील बराचसा भाग विक्रीवरील करापायीं सरकारला द्यावा लागतो. पण ह्याहीपेक्षा दुसरी एक अडचण जरा चमत्कारिक स्वरूपाची आणि बाजारपेठेवर अवलंबून असणारी आहे. सहकारी संस्था ज्यांची शिफारस करतील त्याच ताड–कामगारांना ताडीपासून गूळ तयार करण्याचा परवाना देण्यांत येतो. खुल्या बाजारांत ताडगुळास अधिक चांगली किंमत येत असल्यामुळें परवानेदार कामगार आपला माल सहकारी संस्थांना विकण्यास नाखुष असतात. किंबहुना, खुल्या बाजारांत माल विकण्याचा मोहच त्यांना अधिक होतो. ह्या सर्व अडचणींवर सहकारी संस्थांनीं पुढीलप्रमाणें उपाय सुचविले. सहकारी संस्थांमार्फत ताडगुळाची जी विक्री होईल तीवर राज्य–सरकारनें विक्रीकर घेऊं नये. बिगर हंगामाच्या वेळीं संस्थांतून काम करणाऱ्या नोकर–वर्गाचा पगार भागविण्यास सरकारनें आर्थिक मदत द्यावी आणि जे परवानेदार आपला माल सहकारी संस्थांना विकणार नाहींत त्यांचे परवाने रद्द करावे. श्री. नाईक ह्यांनीं ह्याविषयीं मध्यवर्ती आणि राज्य–सरकारांना जरूर त्या शिफारसी करूं असें आश्वासन दिलें आहे. ताडगूळ शुद्ध करण्याची एक नवीन पद्धत श्री. नाईक ह्यांनीं सुचविली आहे.

### " किर्लोस्कर न्यूज "

" किर्लोस्कर न्यूज " चा तिसरा अंक नुकताच प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून वेगवेगळ्या किर्लोस्कर कंपन्यांच्या ताज्या प्रगतीची चांगली कल्पना येते. उदाहरणार्थ, म्हैसूर राज्यांत तुंगभद्रा नदीवर लिफ्ट इरिगेशनला चालना देण्यासाठीं नदीचे काठानें १४ मैल लांब विजेच्या तारा म्हैसूर सरकारनें बसविल्या आहेत. किर्लोस्कर पंपिंग सेट्स ह्या कामीं उपयुक्त कार्य करूं लागले आहेत. मीठ तयार करतांना पाणी पंप करावें लागतें, त्यासाठीं दर मिनिटाला ४,००० गॅलन पाणी खेचणारा पंप किर्लोस्करांनीं बनविला आहे. म्हैसूर किर्लोस्करचीं मशीन टूल्स परदेशांत जाऊं लागलीं आहेत. पूर्व आफ्रिका, चीन, बर्मा, इत्यादि देशांकडे ती निर्गत होऊं लागलीं आहेत. किर्लोस्कर ऑइल इंजिन्सचा कारखाना मेटल बेअरिंग, बुशेस व थ्रस्ट वॉशर्स ह्या बाबतींत स्वयंपूर्ण होऊं लागला आहे व इतर कारखानदारांची मागणीहि तो आतां पुरवूं लागेल. ५ ते १०० हॉर्स पॉवरच्या किर्लोस्कर इलेक्ट्रिक मोटारी भाक्रा–नानगल नदी–योजनेवर लवकरच सेवेस हजर होतील.

### बँक ट्रायब्यूनल अवार्डची अंमलबजावणी स्थगित

लेबर अपेलेट ट्रायब्यूनलनें ऑल इंडिया बँक एम्प्लॉईज असोसिएशनच्या अर्जावरून, शास्त्री अवार्डची अंमलबजावणी तहकूब करण्याचा हुकूम केला आहे. असोसिएशनच्या अपिलाचा निर्णय लागेपर्यंत ही तहकुबी अंमलांत राहील. " शास्त्री अवार्ड अंमलांत आणल्यानें बँक नोकरांवर गंभीर परिणाम घडून येतील " असें ट्रायब्यूनलनें तहकुबी देतांना नमूद केलें आहे.

SAVE to help yourself and the NATION,
WITH THE

HOME SAFE
THE SARASWAT CO-OPERATIVE BANK LTD.
GIRGAON, BOMBAY.
Branches: Dadar, Mahim, Poona & Belgaum

### सोविएत जनतेला प्राप्ति–कर किती भरावे लागतात ?

कारखान्यांतील व कचेरींतील कामगार, कलावंत, कारागीर व स्वतंत्र उत्पन्नाची सोय असलेले इतर नागरिक यांना उत्पन्नावरील कर भरावा लागतो. महिन्याला २६० रुबलसच्यावर मिळकत नसलेल्या कारखान्यांतील व कचेरींतील कामगारांना व सर्व प्रकारच्या पेन्शनरांना, त्यांच्या पेन्शनची रक्कम विचारांत न घेतां, उत्पन्नाच्या करांतून वगळण्यांत आलें आहे.

आदल्या महिन्याच्या मिळकतींतून दर महिन्याला कामगार उत्पन्नावरील कर भरतात. कराचें प्रमाण खालीलप्रमाणें आहे.

| महिन्याचें उत्पन्न | कर |
|---|---|
| ४०० रुबल्स | १८ रुबल्स |
| ५०० रुबल्स | २६ रुबल्स |
| ६०० रुबल्स | ३६ रुबल्स |
| ७५० रुबल्स | ५२ रुबल्स |
| १००० रुबल्स | ८२ रुबल्स |
| १५०० रुबल्स | १४७ रुबल्स |

जास्तींत जास्त भरावा लागणारा कर मिळकतीच्या १३ टक्क्याच्या वर कधींच जात नाहीं.

एखाद्या कामगाराच्या कुटुंबांत त्याच्यावर अवलंबून असलेल्या माणसांची संख्या चार किंवा त्यापेक्षां जास्त असल्यास त्याला भराव्या लागणाऱ्या कराचें प्रमाण फारच कमी होतें.

१९४१ साली मूल नसलेल्या किंवा दोनांपेक्षा अधिक मुलें नसलेल्या नागरिकांवर कर बसविण्यांत आला. मूल नसलेल्या २० ते ५० वयाच्या दरम्यानच्या पुरुषाला व २० ते ४५ च्या दरम्यानच्या स्त्रीला आपल्या मिळकतीच्या ६ टक्के कर द्यावा लागतो. १ मूल असलेल्यांना मिळकतीच्या १ टक्के कर द्यावा लागतो व दोन मुलें असलेल्यांना १/२ टक्के कर भरावा लागतो. दोनापेक्षा जास्त मुलें असलेल्या नागरिकांना हा कर भरावा लागत नाहीं.

लष्करांतील माणसांना व त्यांच्या बायकांना, अपंग माणसांना व ज्यांचीं मुलें गेल्या महायुद्धांत मारलीं गेलीं अशा नागरिकांना कर द्यावा लागत नाहीं.

### इंपीरिअल बँकेचें डिव्हिडंड

इंपीरिअल बँक ऑफ इंडियानें जून, १९५२ अखेरच्या सहामाहीकरितां १६% डिव्हिडंड जाहीर केलें आहे. पूर्वीच्या हिशेबांतील शिल्लकी नफा ( ४२,०७,५०० रु. ) धरून नफा वाटणीस १,०५,१७,८०० रु. आले. ३७,३९,००० रु. पुढील हिशेबांत ओढण्यांत आले.

## रिझर्व्ह बँकेचा १९५२–५३ चा अहवाल

रिझर्व्ह बँकेचा १९५२–५३ चा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला त्यावरून असें दिसून येतें कीं कोरियन युद्धानंतर निर्माण झालेली परिस्थिति जगांतील पुष्कळशा देशांतून सुधारत चालली आहे, व लष्करी खर्च मोठ्या प्रमाणांत चालू असला तरी त्यामुळें चलनविस्ताराला मदत झालेली नाहीं. बहुतेक सर्व देशांत किंमती साधारपणें स्थिर आहेत किंवा त्यांत किरकोळ बदल झाले आहेत. पैसा महाग राखण्याचें धोरण सामान्यपणें १९५२ मध्यें तसेंच चालू राहिलें व कांहीं देशांत डिस्काउंटच्या दरांत वाढ करण्यांत आली. निरनिराळ्या देशांनीं लष्करी खर्च चालू ठेवला तरी भांडवल–गुंतवणुकीच्या दृष्टीनें करविषयक सवलती देण्यास सुरुवात केली आहे. कांहीं ठिकाणीं मालाचा खप व्हावा म्हणूनहि सवलती दिल्या गेल्या. मागसलेल्या देशांच्या बाबतींत निर्गत मालाच्या किंमती कमी झाल्यामुळें सरकारच्या हातीं कमी पैसा येऊं लागला परंतु विकास–योजनांवरील खर्च मात्र वाढतच चालला. डॉलर गटांतील देशांची व्यापारी देण्याच्या बाबतींतील परिस्थिति १९५२ मध्यें सुधारली. स्टर्लिंग गटाला १९५१ मध्यें ५३·१ कोटी पौंड प्रतिकूल तफावत आली होती, परंतु १९५२ मध्यें ७·७ कोटी पौंड अनुकूल तफावत उरली. आयातीवरील नियंत्रणामुळें व चलनविषयक उपायामुळें ही गोष्ट साध्य झाली. पंचवार्षिक योजनेचा दुरुस्त आराखडा डिसेंबर १९५२ मध्यें प्रसिद्ध झाला ही हिंदमधील एक उल्लेखनीय गोष्ट आहे. हिंदमध्यें फाळणीनंतरचे दुष्परिणाम गेल्या वर्षी बऱ्याच प्रमाणांत आटोक्यांत आले व आर्थिक परिस्थितींत सुधारणा झाली. नोव्हेंबर १९५१ मध्यें पैशाच्या बाबतींत स्वीकारलेल्या धोरणामुळेंहि परिस्थिति सुधारण्याला मदत झाली. औद्योगिक उत्पादनांत १९५१ च्या मानानें १० टक्क्यांनीं सुधारणा झाली. मूलभूत मालाच्या व उपभोग्य मालाच्या बाबतींत सुधारणा दिसून आली. कच्च्या मालाची उपलब्धता व मालक–मजूर यांमधील सलोख्याचे संबंध यांमुळेंहि उत्पादन वाढीला मदत झाली. कापूस, ताग व साखर यांच्या उत्पादनांत सुधारणा झाली परंतु अन्नधान्य व तेल–बिया यांचें उत्पादन थोडेंसें घटलें. १९५१–५२ मधील परदेशी धान्याच्या आयातीमुळें अन्नपरिस्थिति समाधानकारक राहूं शकली. पैशाच्या बाबतींतल्या नवीन धोरणामुळें मालाची साठेबाजी व सट्टेबाजी यांच्या बाबतींत सुधारणा दिसून आली. पैशाचा पुरवठा रु. ३७ कोटींनीं कमी झाला, व पैशाची परिस्थिति आणि बँकिंगचे व्यवहार या बाबतींत पूर्ववत स्थिति निर्माण झाली. भांडवलाच्या बाबतींत जास्त स्थैर्य दिसून आलें. १९५२–५३ मध्यें विकास–योजनांवर रु. ३२२ कोटी खर्च झाला, परंतु १९५१–५२ मध्यें खर्च रु. २६२ कोटी झाला होता. निर्गत मालाच्या बाबतींत मालाची किंमत व निर्गतीवरील जकात कमी करावी लागली. परराष्ट्रीय देण्याच्या बाबतींत जगांतील इतर देशांत व हिंदमध्येंहि दिसून आलेल्या चलनसंकोचाला तोंड द्यावें लागलें.

---

**विद्यार्थ्यांची सहकारी संस्था**—लखनौ विद्यापीठानें विद्यार्थ्यांची एक सहकारी संस्था स्थापन करण्याचें ठरविलें आहे. विद्यापीठाच्या आवारांत वस्ती करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना तींत भाग घ्यावा लागेल. भोजनालयें, हॉटेल्स, शिंपीकाम इत्यादि कामें संस्था करील. प्रत्येक विद्यार्थ्याला १० रुपयांचा भाग विकत घ्यावा लागेल. नफा होईल तो विद्यार्थ्यांच्या हितासाठी खर्च करण्यांत येईल.

## जागतिक अन्न व शेतकी संघटनेची विभागीय बैठक बंगलोर येथें भरणार

जागतिक अन्न व शेतकी संघटनेच्या आशिया आणि अतिपूर्व यांतील अन्न व शेतकीविषयक कार्यक्रम व दृष्टिकोन यांवरील विभागीय समितीची बैठक बंगलोर येथें २७ जुलै, १९५३ ते ५ ऑगस्ट, १९५३ पर्यंत भरणार आहे. भारतानें या बैठकीसाठी निमंत्रण दिलें आहे. या बैठकीस ऑस्ट्रेलिया, ब्रह्मदेश, सिलोन, इण्डोनेशिया, जपान, कोरिया, नेपाळ, पाकिस्तान, थायलंड, व्हिएतनाम, कंबोडिया, लाओस, फ्रान्स, इंग्लंड, हॉलंड, पोर्तुगाल, फिलिफाइन बेटें आणि अमेरिका या देशांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

---

## प्लॅस्टिकच्या धंद्याची वाढ

गेल्या १२ वर्षांच्या काळांत अमेरिकेंतील प्लॅस्टिकचा धंदा हा वार्षिक १ अब्ज डॉलरचा धंदा होऊन बसला आहे. या धंद्यामध्यें २ लक्षापेक्षां अधिक स्त्री–पुरुष नोकरीवर आहेत. दुसरें जागतिक युद्ध सुरू झालें त्या काळीं "प्लॅस्टिक युग" अमेरिकेंत सुरू झालें. लष्करी हालचालींमुळें त्या काळांत परदेशांतून रबर, टिन आणि अन्य आवश्यक असा कच्चा माल येण्याचें बंद झालें त्यावेळपासून अमेरिकेंत "प्लॅस्टिकचें युग" सुरू झालें. हा कच्च माल परदेशांतून येण्याचें बंद झालें म्हणून अमेरिकेंतील शास्त्रज्ञांनीं पर्याय शोधून काढण्यास घाईघाईनें सुरवात केली. या संशोधनांत त्यांना असें आढळून आलें कीं, प्लॅस्टिक कांहीं बाबतींत केवळ स्वीकारार्हच नव्हे तर अधिक चांगलें असतें. आज सुमारें ५,००० कारखानदार प्लॅस्टिकच्या या ना त्या वस्तू तयार करीत आहेत.


दि

# बँक ऑफ महाराष्ट्र लि.

स्थापना १९३५: मुख्य कचेरी–थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.

संचालक मंडळ

श्री. धों. कृ. साठे (अध्यक्ष) — श्री. श्री. गो. मराठे (उपाध्यक्ष)

श्री. न. ग. पवार — श्री. मा. रा. जोशी

श्री. फ. दो. पदमजी — श्री. मा. वी. शहा

श्री. शं. ल. किर्लोस्कर — श्री. भा. म. गुप्ते

बँकेच्या शाखा

मुंबई (फोर्ट, गिरगांव, दादर व कल्याण), पुणें (डेक्कन जिमखाना व खडकी), नाशिक, चाळिसगांव, धुळें, जळगांव, नागपूर, रत्नागिरी, कोपरगांव, हुबळी, सोलापूर, कोल्हापूर, द. हैद्राबाद, सांगली, अमरावती, ठाणें व हरिहर (म्हैसूर सं.)

आपल्या मौल्यवान चीजवस्तू बँकेच्या मजबूत सेफ डिपॉझिट व्हॉल्टस् मध्यें ठेवा.

चिं. वि. जोग,
मॅनेजर.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.